पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 13/03/2019 (बुधवार)
(सायंकाळ)

---

## अवैद्य पानमसाला बाळगणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद
## पोलिस स्टेशन बोरीची कारवाई

दिनांक 12/03/2019 रोजी 20.00 वा चे सुमारास फिर्यादी नामे– श्री. किरण रंगास्वामी गेडाम, वय 43 वर्ष, अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासन नागपुर (म.रा)प्रशासकिय इमारत क्र. 02, 5 वा. माळा सिविल लाइन, नागपुर यांना बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, एनएल– 01/के–2205 क्रमांकाचा कंटेनर यामधून सरकारदवारे बंदी असणारा पानमसाला ची वाहतुक होत आहे. अशी माहिती मिळाल्यावर त्यांनी पो.स्टे बोरी पोलिस स्टाफ यांच्या मदतीने एमआयडिसी चौक येथे नाकाबंदी केली. पो.स्टे. बोरी पथकाने रस्त्याने येत असलेल्या एनएल– 01/के–2205 क्रमांकाचा कंटेनरला थांबवून चेक केले असता त्यामध्ये मिळालेल्या माहिती प्रमाणे पानमसाला असल्याचे आढळून आले. त्यासोबत असणारा कंटेनर चालक आरोपी नामे– आशिष नाशिर खान, वय 21 वर्ष, रा. हटेडा ग्राम उटावड उतावर जि. पलवन (हरियाना) याला अटक करण्यात आले. आरोपीच्या ताब्यातून 1) पान मसाला (राजविलास) चे पॅकेट 150 ग्राम वजनाचे प्रत्येकी कि. 140/–रू. अशा एकुण 6528 पॅकेटस एकुण वनज 979.2 किलाग्राम एकुण किं 9,13,920/–रू., 2) एनएल– 01/के–2205 क्रमांकाचा कंटेनर कि. 25,00,000/–रू. चा असा एकुण कि. 34,13,920/–रू. चा मुद्देमाल मिळुन आला.

पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 188, 272, 273, 328 भादवी, सहकलम अन्न सुरक्षा च मानदे कायदा 2006 कलम 26(2)(पअ) तसेच 3(1)(22)(अ) शिक्षा पात्र कलम 59 अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन बोरीचे पोलीस उपनिरीक्षक श्री. मनोज मेश्राम हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही नागपुर (ग्रामिण) पोलीस अधिक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती मोनिका राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली बोरीचे ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री. आसीफ शेख व अन्न व औषध प्रशासन नागपुरचे अन्न सुरक्षा अधिकारी श्री. किरण रंगास्वामी गेडाम यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक श्री. मनोज मेश्राम, पोना रामदेव दोडके, पोशि श्री. योगेश भुरे, श्री. विनायक साढव व अन्न व औषध प्रशासन नागपुर यांचा स्टाफ यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.

# अकस्मात मृत्यू

1) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 2 कि. मी. अंतरावर मौजा सावनेर टाऊन येथे दिनांक 25/02/2019 चे 17.30 वा. दरम्यान सुनिल गंगाधर कमाले, वय 37 वर्ष, रा. शितला माता मंदिर जवळ, पहलेपार, सावनेर यांनी राहत्या घरी अज्ञात कारणावरून विषारी औषध प्राशन केल्याने त्यांना उपचाराकरीता प्रथम सरकारी दवाखाना, सावनेर व नंतर मेयो हॉस्पीटल नागपूर येथे भरती केले. उपचारादरम्यान दिनांक 09/03/2019 चे 06.00 वा. त्यांचा मृत्यू झाला.संबधीत कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी पोलिस हवालदार निकोसे, मेयो पोलिस बुथ, नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस हवालदार नारायाण बोरकर हे करीत आहे.

2) पो.स्टे. वेलतुर :– अंतर्गत 1 कि. मी. अंतरावर वेलतुर येथे दिनांक 11/03/2019 चे सायंकाळी 06.00 वा. दरम्यान रवी नरेश नंदनवार, वय 24 वर्ष, रा. वेलतुर यांने विषारी औषध प्राशन केल्याने उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– दिवाकर रमेश नंदनवर, वय 30 वर्ष, रा. वेलतुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. वेलतुर येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार सादवराव कुमरे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर